# परिशिष्ट - ९ (ब)

# पंचायत समिती प्रारूप आरक्षणाबाबतची अधिसूचना

क्रमांक **२०२५/जिपपंस/आरक्षण/कावि-१२२**

ज्याअर्थी राज्य शासनाकडील क्र.जिपनी-२०२५/प्र.क्र.३६/पं.रा.२, दिनांक १२/०६/२०२५ व दि.१८/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार पूर्णा पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरिता १२ निर्वाचक गणाच्या भौगोलिक सिमा क्र.२०२५/सा.प्र./जिपपसनि/प्र.क्र.२, दिनांक २२/०८/२०२५ च्या अधिसूचनेन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील तरतुदी अन्वये आणि राज्य निवडणूक आयोगाकडील क्र.रानिआ/जिपपंसनि-२०२५/प्र.क्र.२९/का-७, दिनांक ०१/१०/२०२५ च्या आदेशान्वये पूर्णा पंचायत समितीमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकाचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रीयांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकाचा मागास प्रवर्ग व स्त्रीयांसह) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाकडील क्र.रानिआ/जिपपस-२०२५/प्र.क्र.२९/का-७, दि.०१/१०/२०२५ च्या आदेशान्वये आरक्षण सोडत काढून त्याची सोडतीद्वारे काढण्यात आलेल्या आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचे अधिकार संबधित तहसिलदार यांना प्रदान केले असून सदर आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानुसार पुर्णा पंचायत समितीमधील आरक्षित निर्वाचक गणांची जाहीर सोडत दिनांक १३/१०/२०२५ रोजी काढण्यात आली. सदर सोडतीनंतर निश्चित झालेले निर्वाचक गणनिहाय आरक्षणाची प्रारुप अधिसूचना याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे;

आणि त्याअर्थी, सदर प्रारुप आरक्षणाची अधिसूचना जिल्हा परिषद क्षेत्रातील सर्व रहिवाश्याच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत असून सूचना देण्यात येत आहेत की, सदर प्रारुप आरक्षण अधिसूचनेस, ज्या लोकांच्या काही हरकती असतील, त्यांनी त्या जिल्हाधिकारी, परभणी व तहसिलदार, पूर्णा यांच्याकडे सादर कराव्यात. सदर तारखेनंतर आलेल्या हरकती विचारात घेण्यात येणार नाही.



Scanned with OKEN Scanner

## पूर्णा पंचायत समितीमधील एकुण जागांचा तपशील

| अ. क्र. | प्रवर्ग | एकुण जागांची संख्या | पैकी महिलांकरीता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | २ | १ |
| २ | अनुसूचित जमाती | ० | ० |
| ३ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | ३ | २ |
| ४ | सर्वसाधारण | ७ | ३ |
| | एकुण | १२ | ६ |

## पूर्णा पंचायत समितीमधील निर्वाचक गण निहाय आरक्षणाचा तपशील

| अ. क्र. | तालुका | निवडणुक विभाग क्रमांक व नाव | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | पुर्णा | ३८ - एरंडेश्वर | ७५ - एरंडेश्वर | सर्वसाधारण प्रवर्ग (महिला) |
| २ | | | ७६ - आहेरवाडी | सर्वसाधारण प्रवर्ग (महिला) |
| ३ | | ३९ - चुडावा | ७७ - चुडावा | अनुसूचित जाती (महिला) |
| ४ | | | ७८ - देगाव | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| ५ | | ४० - कावलगाव | ७९ - कावलगाव | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) |
| ६ | | | ८० - धानोरा मोत्या | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) |
| ७ | | ४१ - गौर | ८१ - गौर | सर्वसाधारण प्रवर्ग |
| ८ | | | ८२ - धनगर टाकळी | सर्वसाधारण प्रवर्ग |
| ९ | | ४२ - ताडकळस | ८३ - ताडकळस | अनुसूचित जाती |
| १० | | | ८४ - फुलकळस | सर्वसाधारण प्रवर्ग |
| ११ | | ४३ - वझुर | ८५ - वझुर | सर्वसाधारण प्रवर्ग |
| १२ | | | ८६ - देऊळगाव दुधाटे | सर्वसाधारण प्रवर्ग (महिला) |

ठिकाण : पूर्णा
दिनांक : १४/१०/२०२५

(माधवराव बोथीकर)
तहसिलदार, पूर्णा

(उदयसिंह भोसले)
उप विभागीय अधिकारी, परभणी

(संजयसिंह चव्हाण)
जिल्हाधिकारी, परभणी

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी परभणी



Scanned with OKEN Scanner